फक्त सभासदांसाठी

# अमर हिंद मंडळ, दादर

अमरवाडी, गोखले पथ (उत्तर), दादर, मुंबई - ४०० ०२८.
दूरध्वनी : २४२२ ३५ ८९ / २४२१ ९० ११

(स्थापना : २६ जानेवारी १९४७)

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई) संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५-६-१९४९)



अमर हिंद मंडळ दादर, मुंबई - २८

## वार्षिक अहवाल

(१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८)

# अमर हिंद मंडळ, दादर

१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८

## ★ विश्वस्त ★

श्री. दिनकर पाटील — ॲड. श्री. मुकुंद तिवरेकर

श्रीमती उषा मेहता

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | : | श्री. वसंत भालेकर |
| **उपाध्यक्ष** | : | श्री. रमेश वरळीकर |
| | | मेजर श्री. विजय अडसुळे |

## ★ कार्यकारी समिती ★

| | | |
|---|---|---|
| **कार्याध्यक्ष** | : | श्री. चिंतामणी नागले |
| **कार्योपाध्यक्ष** | : | श्री. अरुण देशपांडे २०.०७.२००७ पर्यंत |
| | | श्री. दीपक पडते ०५.०९.२००७ पासून |
| **कार्यवाह** | : | श्री. उमेश शेणॉय १६.०७.२००७ पर्यंत |
| | | श्री. अरुण देशपांडे २०.०७.२००७ पासून |
| **संयुक्त कार्यवाह** | : | श्री. सतीश रेडीज |
| **कोषाध्यक्ष** | : | श्री. श्रीकृष्ण राणे |
| **सदस्य** | : | श्री. दीपक पडते ०५.०९.२००७ पर्यंत |
| | | श्री. भास्कर केरकर |
| | | श्री. चारुदत्त धरवल |
| | | श्री. संजय पेडणेकर |
| | | श्री. विजय राणे |
| | | डॉ. स्नेहल बिर्जे |
| **सदस्य (स्वीकृत)** | : | श्री. दत्ता सावंत, श्री. प्रफुल्ल पाटील |

# अमर हिंद मंडळ, दादर

## मुंबई - ४०० ०२८.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २०/०८/२००८ रोजी सायंकाळी ५.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. वसंत भालेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

सभेपुढील कामे :-

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. सन् २००७ - २००८ सालचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.
३. सन् २००७ - २००८ सालचा हिशेब व ताळेबंद मंजूर करणे.
४. सन् २००८-२००९ साठी हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
५. सन् २००८-२००९ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.
६. निधीत रक्कम वर्ग करण्याबाबतचा ठराव मंजूर करणे.
७. मंडळाच्या घटनेतील नियमात पुढील प्रमाणे सुधारणा करणे.

| घटनेतील नियम | सुचविलेला बदल |
|---|---|
| नियम क्र. (३) कालगणना<br>वर्षगणना १ जानेवारी ते ३१ डिसेंबर राहील. | नियम क्र. (३) वर्षगणना<br>वर्षगणना १ एप्रिल ते ३१ मार्च राहील. |
| नियम क्र. (७) सभासदाचे प्रकार<br>१) देणगीदार : एक रकमेने अगर हप्त्याने एक वर्षात रु. ५००/- किंवा अधिक देणारे.<br>२) आश्रयदाते : एक रकमेने अगर हप्त्याने एक वर्षात रु. २५०/- किंवा अधिक देणारे.<br>३) तहह्यात सभासद एक रकमेने अगर हप्त्याने एका वर्षात रु. १००/- किंवा अधिक देणारे<br>४) सर्वसाधारण सभासद प्रवेश फी एक रुपया भरुन वार्षिक वर्गणी रु. १२/- देणारे<br>सर्वसाधारण सभासदाची वर्गणी वर्षारंभीत आगाऊ दिली पाहिजे. | नियम क्र. (७) सभासदाचे प्रकार<br>१) देणगीदार : रु. २५०१/- किंवा अधिक देणारे<br>२) आश्रयदाते : किमान रु. २५००/-<br>३) तहह्यात सभासद : रु. १०००/- देणारे<br>४) सर्वसाधारण सभासद : वार्षिक वर्गणी रु. २५/- देणारे<br>सर्वसाधारण सभासदत्वाची वर्गणी वर्षारंभीच आगाऊ दिली पाहिजे. |
| टीप : १ ते ३ गटातील सभासदांना विभागीय फी द्यावी लागणार नाही. | रद्द |
| नियम क्र. (८)<br>वार्षिक सर्वसाधारण सभेपुर्वी निदान सहा महिने सभासद व वर्गणी बाकी नसलेल्या सभासदालाच सभेतील कामासंबंधी, मतदानाचा अधिकार राहील. कमीत कमी सतत तीन वर्षे, सभासद असणाऱ्या सभासदालाच कार्यकारी समितीच्या निवडणुकीला उभे राहता येईल. | नियम क्र. (८)<br>वार्षिक सर्वसाधारण सभेपुर्वी निदान सहा महिने तहह्यात सभासद असलेल्या सभासदालाच सभेतील कामकाजातभाग घेता येईल तसेच मतदानाचा अधिकार राहील. किमान तीन वर्षे तहह्यात सभासद असणाऱ्या सभासदालाच कार्यकारी समितीच्या निवडणुकीला उभे राहता येईल. |

| घटनेतील नियम | सुचविलेला बदल |
|---|---|
| नियम क्र. (९)<br>अ) सभासदाची वर्गणी एक वर्ष बाकी राहिल्यास त्याचे सभासदत्व आपोआप रद्द होईल. परंतु थकलेली वर्गणी व प्रवेश फी भरुन त्याला पुन्हा कार्यकारी समितीने नवीन सभासद होता येईल. | नियम क्र. ९ अ) रद्द<br>नियम क्र. ९<br>आ) ऐवजी अ)<br>आ) अक्षर रद्द |
| नियम क्र. (११)<br>विश्वस्त व त्यांचे अधिकार :<br>आ) विश्वस्तांची निवड १ ते ३ गटातील कमीत कमी ५ वर्षे सभासद असलेल्यांतून सर्वसाधारण सभेत केली जाईल.<br>ई) राजीनामा, नादारी, मानसिक अगर शारीरिक दुर्बलता, नैतिक अध, पाताच्या गुन्ह्याबद्दल झालेली शिक्षा अगर निधन या कारणामुळे विश्वस्तांची जागा रिकामी झाल्यास त्या जागेची निवडणुक त्यानंतर होणाऱ्या पहिल्या सर्वसाधारण सभेत कमीत कमी ५ वर्षे १ ते ३ गटातील सभासदातून केली जाईल. | नियम क्र. (११)<br>विश्वस्त, अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवड<br>आ) विश्वस्त, अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवड कमीत कमी ५ वर्षे तहह्यात सभासद असलेल्यांतून सर्वसाधारण सभेत केली जाईल.<br>ई) राजीनामा, नादारी, मानसिक अगर शारीरिक दुर्बलता, नैतिक अध:पाताच्या गुन्ह्याबद्दल झालेली शिक्षा अगर निधन या कारणामुळे विश्वस्तांची जागा रिकामी झाल्यास त्या जागेची निवडणुक त्यानंतर होणाऱ्या पहिल्या सर्वसाधारण सभेत कमीत कमी ५ वर्षे तहह्यात सभासद असलेल्या सभासदातून उरलेल्या मुदतीसाठी केली जाईल. |
| नियम क्र. (२३)<br>विश्वस्त व त्यांचे अधिकार :<br>आ) वार्षिक सर्वसाधारण व विशेष सर्वसाधारण सभेची सूचना सर्व सभासदांना किमान १५ दिवस आधी देण्यात आली पाहिजे. ती सूचना मंडळाच्या फलकावर लावण्यात यावी व ती निदान एक तरी मराठी दैनिकात देण्यात यावी. | नियम क्र. (२३)<br>आ) वार्षिक सर्वसाधारण व विशेष सर्वसाधारण सभेची सूचना सर्व सभासदांना किमान १५ दिवस आधी देण्यात आली पाहिजे. ती सूचना मंडळाच्या फलकावर लावण्यात यावी व ती निदान एक तरी मराठी दैनिकात देण्यात यावी. या सभांसाठी किमान वीस तहह्यात सभासद गणपूर्तीसाठी हजर असले पाहिजेत. |

८. निवडणुकीचा निकाल जाहीर करणे.
९. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांवर विचार करणे.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने
अरुण अ. देशपांडे
कार्यवाह

दि. ०५/०७/२००८

## सूचना :

१. गणपूर्ती अभावी नियोजितवेळी सभा सुरु न झाल्यास सभा स्थगीत करण्यात येईल, ही स्थगीत सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी ५.३० वाजता भरेल व ही सभा पूर्णपणे वैध असेल.

२. सभासदांना अहवाल, हिशेब, अंदाजपत्रक, संस्थेच्या कामकाजासंबंधी सभेत प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी ते मंडळाच्या कार्यालयात लेखी स्वरुपात गुरुवार, दि.७ ऑगस्ट २००८ पर्यंत सायं. ६ ते ८ या वेळेत (रविवार व्यतिरिक्त) सादर करावेत.

३. सभासदांनी आपले बदललेले पत्ते त्वरीत कळवावेत तसेच हयात नसलेल्या सभासदाच्या संबंधितांनी तत्सबंधीची माहिती कार्यालयात कळविण्याची कृपा करावी.

४. निवडणुकीची सूचना आणि कार्यक्रम वेगळा जाहीर करण्यात आलेला आहे.

# अमर हिंद मंडळ, दादर

अमरवाडी, गोखले रोड (उ.), दादर, मुंबई - ४०० ०२८.

(स्थापना १९४७)

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई) संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५६-१९४९)

## निवडणूकीचा कार्यक्रम / नियम अटी

अमर हिंद मंडळाच्या घटनेप्रमाणे पुढील तीन वर्षासाठी अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष आणि कार्यकारी समितीच्या ११ सभासदांची निवड करण्यात येणार आहे. कार्यकारी समितीने या वेळच्या निवडणूकीसाठी निवडणूक अधिकारी म्हणून मा. डॉ. अनिल वाकणकर यांची नेमणूक केलेली आहे. त्यास सहाय्यक म्हणून मा. श्री. केशव सामंत हे काम पाहतील.

निवडणूक अधिकाऱ्यांच्या संमतीने निवडणुकीसंबंधीचा खालील कार्यक्रम सर्व सभासदांच्या माहितीसाठी जाहीर करण्यात येत आहे.

१. मंडळाच्या घटनेप्रमाणे तीन वर्षांसाठी अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) आणि कार्यकारी समितीचे सभासद (११ जागा) यांची निवड करण्यात येईल. इच्छुक उमेदवारांनी प्रत्यक्ष येऊन सही करुन उमेदवारी अर्ज घेऊन जाणे बंधनकारक आहे.

२. वरील जागांसाठी भरावयाचे उमेदवारी अर्ज मंडळाच्या कचेरीत दि. २१ जुलै ते २५ जुलै २००८ सायंकाळी ७.०० ते ८.०० या वेळेत मिळतील.

३. पूर्ण भरलेले उमेदवारी अर्ज मंडळाच्या कचेरीत दिनांक २८ जुलै २००८ पर्यंत वरील वेळेत स्वीकारण्यात येतील.

४. अर्जांची छाननी दिनांक २९ जुलै २००८ रोजी सायंकाळी ७ वाजता करण्यात येईल.

५. वैध उमेदवारांची यादी दि. ३० जुलै २००८ रोजी सायंकाळी ७ वाजता जाहीर करण्यात येईल.

६. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख व वेळ, दिनांक १ ऑगस्ट २००८ रोजी सायं. ७ वाजेपर्यंत राहील. ज्यांना उमेदवारी अर्ज मागे घ्यावयाचा असेल त्यांनी लेखी स्वरुपात तसा अर्ज देणे आवश्यक आहे.

७. उमेदवारांची अंतिम यादी दिनांक ४ ऑगस्ट २००८ रोजी सायंकाळी ७.०० वाजता मंडळाच्या सूचना फलकावर लावण्यात येईल.

८. अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि कार्यकारी समितीचे सभासद यांच्या भरावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवारी अर्ज आल्यास निवडणूक घेण्यात येईल.

९. निवडणूक रविवार दि. १० ऑगस्ट २००८ रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत मंडळाच्या जागेत घेण्यात येईल.

१०. निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने होईल.

११. मतदानासाठी पात्र असणारा प्रत्येक तहह्यात सभासद ज्या पदांसाठी जितक्या जागा आहेत तितकी मते देवू शकेल. त्यापेक्षा अधिक मते दिल्यास ती मतपत्रिका बाद ठरविण्यात येईल.

१२. निवडणूकीसंबंधी कोणतीही तक्रार, तंटा, आक्षेप असल्यास तो लेखी स्वरुपात निवडणूक अधिकाऱ्यांकडे देण्यात यावा. यासंबंधीचा निवडणूक अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम स्वरुपाचा असेल आणि तो सर्वांना बंधनकारक राहील.

१३. निवडणुकीची वेळ संपल्यावर निवडणूक अधिकारी मतमोजणी करुन अंतिम निर्णय आगामी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत जाहीर करतील.

१४. निवडणूकीस येताना प्रत्येकाने ओळखपत्र (रेशनकार्ड, निवडणूक ओळखपत्र इ.) बरोबर आणावे, ही विनंती.

दि. ७ जुलै २००८

**अरुण देशपांडे**
कार्यवाह
(कार्यकारी समितीसाठी)

# वार्षिक अहवाल

## (दिनांक १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८)

सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,

सादर नमस्कार,

मंडळाचा वार्षिक अहवाल तसेच जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणाला सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

अहवालकाळात मंडळाच्या आर्थिक बाबतीत तसेच क्रीडा, कला, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत राहण्यात मंडळाने यश मिळविले आहे.

दि. २६ जानेवारी २००८ रोजी मंडळाच्या स्थापनेला ६१ वर्षे पूर्ण झाली. मागील वर्ष हीरकमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे करताना अनेक सामाजिक, शैक्षणिक उपक्रम/कार्यक्रम, कलाक्रीडा महोत्सव मंडळाने मोठ्या दिमाखात साजरे केले. अहवाल काळात मंडळाचे कार्यवाह श्री. उमेश शेणॉय आकस्मितपणे निधन पावल्यामुळे आपण सारेच दुःखात होतो. या अतिव दुःखद घटनेचां परिणाम अहवाल काळातील कार्यक्रम, उपक्रमांवर झाला.

मंडळाचा वार्षिक अहवाल पुढील प्रमाणे आहे.

**सभा :** अहवाल कालावधीमध्ये कार्यकारी समितीच्या १२ सभा झाल्या तर कार्यकारी समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विश्वस्त यांच्या ०५ संयुक्त सभा झाल्या (कार्यकारी समिती सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट अ पहा)

मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. २५ डिसेंबर २००७ रोजी संपन्न झाली या सभेस एकूण ३६ सभासद उपस्थित होते.

**तहह्यात सभासद :** अहवाल काळात ६२ तहह्यात सभासद करुन घेण्यात आले.

**निधी :** अहवाल काळात इमारत निधीत १५,००,०००/- (रुपये पंधरा लाख फक्त) वर्ग करण्यात आले.

**केटरिंग व्यवस्था :** १ जानेवारी २००८ ते ३१ डिसेंबर २००८ या कालावधीसाठी 'मयुर डेकोरेटर्स' यांना संपूर्ण केटरिंग, डेकोरेशन व्यवस्थेसाठी ठेकेदारी देण्यात आली.

**वसंत व्याख्यानमाला :** मंडळाची ६० वी वसंत व्याख्यानमाला शुक्रवार, दि. २० एप्रिल २००७ रोजी योजना आयोगाचे सदस्य मा. डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या 'भारतासमोरील आव्हाने, स्वरुप आणि उपाय' या विषयावरील उद्घाटनपर व्याख्यानाने सुरु झाली. व्याख्यान मालेचा समारोप सोमवार, दि. ३० एप्रिल २००७ रोजी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या 'शिवचरित्र' या विषयावरील व्याख्यानाने झाली. याच वेळी हीरक महोत्सवी वर्षातील कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. (अधिक माहितीसाठी परिशिष्ठ ब पहा)

## उपक्रम आणि कार्यक्रम :

★ १५ एप्रिल ते ३० एप्रिल २००७ : बालनाट्य प्रशिक्षण शिबीर

★ २० एप्रिल ते ३० एप्रिल २००७ : मंडळाचे तहह्यात सभासद श्री. चंद्रकांत भीडे यांचे टंकचित्र प्रदर्शन

★ १७ जून २००७ : अस्तित्व संस्कार प्रबोधिनी आणि अमर हिंद मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने उदयोन्मुख बुद्धीबळपटुंसाठी बुद्धीबळ स्पर्धा

★ २६,२७,२८ जुलै २००७ : अस्तित्व संस्कार प्रबोधिनी आणि अमर हिंद मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, २६ जुलै २००५ च्या महाप्रलंकारी महापुरावरील अनुभवांवर श्री. बाळा पांचाळ यांच्या रांगोळीचे प्रदर्शन

★ १५ ऑगस्ट २००७ : नाटककार मा. श्री. ना. ल. मोरे यांचे हस्ते स्वातंत्र्यदिनाचे ध्वजारोहण करण्यात आले आणि मंडळाच्या गुणवंत खेळाडूंचा गुणगौरव करण्यात आला.

★ २६ जानेवारी २००७ : मा. श्री. यशवंतराव क्षीरसागर यांचे हस्ते प्रजासत्ताक दिनाचे ध्वजारोहण करण्यात आले. वर्धापन दिनांनिमित्त श्रीमती कमला मेहता अंध विद्यार्थी शाळा, दादर या संस्थेतील मुलामुलींच्या गाण्यांचा कार्यक्रम आणि अमर हिंद मंडळ कलाविभागाचा समुहनृत्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

# कला विभाग

## बालनाट्य प्रशिक्षण शिबीर :-

मंडळाच्या कलाविभातर्फे १५ ते ३० एप्रिल २००७ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या बालनाट्य प्रशिक्षण शिबिरात ३५ शिबिरार्थी सहभागी झाले होते. संजय क्षेमकल्याणी, शिवदास घाडके, राजीव जोशी, प्रशांत टिपणीस इत्यादी मान्यवरांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. कला विभाग प्रमुख दत्ता सावंत यांनी संचालन केलेल्या ह्या शिबिराचे सीमा घोगळे यांनी सहसंचालन केले. योगेंद्र माने, चंदन जमदाडे, भाग्यश्री पाणे, जितेंद्र आगरकर, चैताली जमदाडे, वैभवी सावंत, प्राजक्ता राऊत या मंडळाच्या कलाकारांनी शिबिर यशस्वी होण्यासाठी परीश्रम घेतले. दि. ३० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता श्री. शिवाजी मंदिर नाट्यगृहात झालेल्या समारोप प्रसंगी शिबिरार्थींनी 'जादूचा रुमाल' 'खराचोर सापडला' 'चतुर कोल्हा' ह्या बालनाटिका सादर केल्या तर मंडळाच्या कलाकारांनी समुहनृत्ये सादर केली.

बाल अभिनेते कु. आशिष ग्राडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते त्यांच्या हस्ते शिबिरार्थींना प्रशस्तिपत्रके आणि स्मृतीचिन्हे प्रदान करण्यात आली. ह्या बालनाट्य शिबिरा दरम्यान सह्याद्री वाहीनीतर्फे शिबिराचे चित्रण केले गेले आणि त्याचे सह्याद्री वाहीनी वरुन प्रक्षेपण करण्यात आले.

## कै. आबा पडते राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा :-

कलाक्षेत्रात नावारुपास आलेली मंडळाची एकांकिका स्पर्धा या वर्षी देखील ३७ संस्थानी सहभाग नोंदवून आणि आपापल्या एकांकिका सादर करून ३७ संस्थानी सहभाग नोंदवून आणि आपापल्या एकांकिका सादर करुन अत्यंत उत्साहात संपन्न झाली. स्पर्धेची प्राथमिक फेरी १३,१४ ऑक्टोबर २००७ रोजी मंडळाच्या सभागृहात झाली. या प्राथमिक फेरीसाठी श्रीमती सुलभा मंत्री, श्रीमती लीला हडप, रमेश कुबल, श्री.एस. शंकरराव या मान्यवरांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. दि. २६ ऑक्टोबर २००७ रोजी दुपारी ३ वाजता श्री. शिवाजी मंदिर येथे झालेल्या अंतिम फेरीत पाच एकांकिका सादर झाल्या या अंतिम फेरीसाठी श्रीमती अनुराधा राजाध्यक्ष, श्री.बाळ कुडतरकर, श्री. रविंद्र पांचाळ यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेत माता रमाबाई आंबेडकर मार्ग, का. कल्याण मंडळाच्या वुइ द पिपल या एकांकिकेने ५०००/- रुपयाचे प्रथम पारितोषिक पटकावले. द्वितीय पारितोषिक इंद्रधनुच्या लव्ह एकांकिकेने तर तृतिय पारितोषिक रुची थिएटरच्या समथिंग क्रिएटिव या एकांकिकेने पटकावले. सुप्रसिद्ध अभिनेत्री सविता प्रभुणे यांच्या हस्ते पारितोषिके वितरण करण्यात आली.

अमर हिंद मंडळाच्या कलाविभाग कलाक्षेत्रात उत्तम कामगिरी करीत आहे. आगामी वर्षात कलाविभागतर्फे काही वेगळे उपक्रम आयोजित करण्याचे तसेच कलाविभागाच्या माध्यमातून मंडळाच्या वास्तूत अधिकाधिक कार्यक्रम करण्याचे मानस व्यक्त करीत आहोत.

# क्रीडा विभाग

## कबड्डी : सांघिक

१) अंकुर स्पोर्ट क्लब (भायखळा) आयोजित राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत मंडळाच्या पुरुष संघाला उपविजेतेपद मिळाले. मंडळाचा महिला संघ मात्र उपांत्य उपविजयी ठरला.

२) अजिंक्यतारा (कुंभारवाडा) जिल्हा स्तरी स्पर्धेत महिला गटाचे अजिंक्यपद मंडळाच्या संघाने निर्विवादपणे पटकावले.

**वैयक्तिक :-** (अ) पुढील खेळाडूंचा विविध स्पर्धांतून वैयक्तिक पराक्रमाबद्दल खास गुणगौरव झाला.

१) निकीता नेमाने (अष्टपैलू / सिद्धी स्पोर्टस् क्लब राष्ट्रवादी चषक स्पर्धा)

२) कमलेश नांदोस्कर (दिवसाचा मानकरी/नाशिक महापौर चषक स्पर्धा)

३) हेमंत रडके (उत्कृष्ट पकडीपटू/अंकुर स्पोटर्स क्लब स्पर्धा)

४) निकीता नेमाणे (दिवसाची मानकरी/अंकुर स्पोटर्स क्लब स्पर्धा)

५) कमलेश नांदोस्कर (दिवसाचा मानकरी/ज्युनियर गट-अंकुर स्पोटर्स क्लब स्पर्धा)

६) माधुरी पावस्कर (अष्टपैलू/अजिंक्यतारा स्पर्धा)

ब) पुढील खेळाडूंची प्रतिनिधिक संघात निवड

१) राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी मुंबई शहर संघात निवड

| | |
|---|---|
| साईनाथ काळसेकर<br>सिद्धार्थ गायकवाड<br>तृप्ती भाटकर | खुला गट/नांदेड स्पर्धा ४ ते ८ नोव्हेंबर २००७ |
| आदिती महाडीक<br>चैताली गुरव | सब ज्युनियर गट/औरंगाबाद स्पर्धा/११ ते १४ डिसेंबर २००७ |
| स्नेहा भोगले<br>भक्ती इंदूलकर | ज्युनियर गट / अहमदनगर स्पर्धा/३ ते ७ नोव्हेंबर २००७ |

२) आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धेसाठी निवड

| | |
|---|---|
| तृप्ती भाटकर<br>प्रियांका झेंडे | मुंबई विद्यापीठ संघात |

## खोखो :

अ) मे २००७ मध्ये अशोका क्लब (नायगाव) आयोजित सब ज्युनियर जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत मंडळाच्या किशोर संघाला ३ रा क्रमांक लाभला.

ब) पुढील खेळाडूंची राज्य अजिंक्यपद खोखो स्पर्धेसाठी मुंबई शहर संघात निवड झाली.

१) नयन वाजे (महिला गट/जलना स्पर्धा/डिसेंबर २००७)

२) विनित कागडा (ज्युनियर /मुं. उपनगर स्पर्धा/ऑक्टोबर २००७)

३) प्रसाद राड्ये, अभिषेक कागडा, श्रद्धा नमसले (सब ज्यु./नंदकुमार/नोव्हेंबर २००७)

क) पुढील खेळाडूंचा वैयक्तिक पराक्रमाबद्दल विविध स्पर्धांतून गुणगौरव झाला.

१) प्रसाद कांबळे (दिवसाचा मानकरी/पार्ले स्पोटर्स क्लब जोड जिल्हा स्पर्धा)

२) नयन वाजे (दिवसाची मानकरी/खुला गट जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा/ना.म.जोशी मार्ग)

३) काटोल (नागपूर) अ.भा. स्पर्धेत निलेश सावंत (दिवसाचा मानकरी/तर प्रसाद कांबळे व निकेश धुरी (सामन्याचे मानकरी) ठरले.

## इतर विशेष :-

मंडळाच्या कबड्डी खेळाडू तृप्ती भाटकर व दिप्ती पारकर यांना पतियाळाच्या राष्ट्रीय क्रीडा संस्थेची २००६-२००७ ची क्रीडा शिष्यवृत्ती मिळाली.

## दैनंदिन सराव :-

कबड्डी -मुल/मुली श्री. विजय राणे खोखो - मुलं श्री. जतीन टाकळे, प्रसाद कांबळी

मुली श्री. अमित संत

श्री. संजय पेडणेकर, श्री. प्रफुल्ल पाटील, श्री. रमेश नाटेकर आवश्यक तेव्हा खोखोसाठी मार्गदर्शन करतात शिवाय मुख्य प्रशिक्षकांच्या गैरहजेरीत जेष्ठ खेळाडू सरावाची जबाबदारी सांभाळतात.

## पुस्तक प्रकाशन :-

कबड्डी संघटक सम्राट आणि अमर हिंद मंडळाचे माजी अध्यक्ष शंकरराव उर्फ बुवा साळवी यांचे १५ फेब्रुवारी २००७ रोजी दीर्घ आजारानंतर निधन झाले. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी मंडळाच्या कार्यकारिणीने पुस्तक प्रकाशित करण्याचा संकल्प केला आणि जेमतेम अडीच महिन्यांच्या अल्प मुदतीत शिवाजी पार्क दादर येथे झालेल्या फेडरेशन चषक अ.भा. कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी (६ मे २००७) केंद्रिय कृषी मंत्री ना. शरद पवार यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले.

या पुस्तकाला ना. शरद पवार यांची प्रस्तावना लाभल्यामुळे पुस्तकाचे मुल्य शतपटीने वाढले. प्रस्तावनेच्या सुरवातीलाच ते लिहीतात **"कबड्डी महर्षी हे पुस्तक दिवंगत शंकरराव उर्फ बुवा साळवी यांचे वैयक्तिक चरित्र नसून कबड्डीचा गेल्या अर्धा शतकाचा धावता इतिहास आहे. या इतिहासाला अक्षररुप देण्याचे महान कार्य मुंबईच्या अमर हिंद मंडळाने केले आहे."**

या पुस्तकात महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री ना. अजितदादा पवार, शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे तसेच कबड्डीतील जानेमाने कार्यकर्ते व क्रीडा पत्रकार यांनी स्वतःची मनोगत व्यक्त केलेली आहेत. बुवांचे दुर्मिळ फोटो असलेल्या या पुस्तकाचे परीक्षण विविध दैनिकांनी आणि नियतकालीकांनी लिहून पुस्तकाचे महत्व कबड्डी रसिकांना पटवून दिले.

मंडळाचे अध्यक्ष श्री. वसंत भालेकर यांनी संपादन केलेल्या या पुस्तकासाठी महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटना, मुंबई शहर, कबड्डी संघटना, ना. अजितदादा पवार यांच्या कार्यालयातील कर्मचारी तसेच श्री. शशिकांत राऊत व श्री. सुधीर खानोलकर यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

## इतर संकीर्ण

★ पाण्याच्या टाक्या साफ करणे, पत्र्यावर डांबर टाकून घेणे, रंगरंगोटी, हॉलची दुरुस्ती इत्यादी कामे अहवालकाळात करुन घेण्यात आली.

★ मंडळाच्या आवारातील वृक्ष आकस्मितपणे पडल्यामुळे मागील भिंत, शेड, पत्रे यांची दुरुस्ती करुन घेण्यात आली.

★ अहवाल काळात ठरवल्याप्रमाणे कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्यात आली.

★ प्रतिवर्षाप्रमाणे माजी अध्यक्ष कै. मधुकर ज. फडके यांच्या स्मरणार्थ गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीसे देऊन गौरविण्यात आले.

★ प्रतिवर्षाप्रमाणे तहह्यात सभासद, आजी माजी खेळाडू हिंतचिंतक यांना दिवाळीची भेटकार्डे मंडळाच्यावतीने पाठविण्यात आली.

★ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त परीसंवादासाठी सभागृह सवलतीच्या दरात देण्यात आले.

★ फेडरेशन चषक अ. भा. कबड्डी स्पर्धेचे औचित्य साधून मंडळाने संकलित केलेल्या कबड्डी महर्षि कै. बुवा साळवी यांच्या वरील पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

★ सी. के. पी. एज्युकेशन सोसायटी यांना गुणी विद्यार्थ्यांचा गुणगौरव या समारंभासाठी सभागृह सवलतीच्या दरात देण्यात आले.

★ दादर अचलगाचा जैन संघ यांना प्रवचन आणि प्रार्थनेसाठी सभागृह सवलतीच्या दरात देण्यात आले.

★ इंडियन असोसिएशन फॉर दि हॅण्डीकॅप या संस्थेला १५००/- रुपये देणगी देण्यात आली.

★ समाज सेविका श्रीमती शरयुताई ठाकूर यांच्या सत्कार समारंभास १०००/- रुपये देणगी देण्यात आली.

## विशेष अभिनंदनीय

मंडळाचे तहह्यात सभासद मा. श्री. विलास गावकर यांना उद्योगश्री प्रकाशनातर्फे उद्योगश्री पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. मंडळाचे कार्यकारी सदस्य श्री. संजय पेडणेकर व श्री. प्रफुल्ल पाटील यांची मुंबई खोखो संघटनेच्या कार्यकारी मंडळावर चार वर्षासाठी स्विकृत सदस्य म्हणून बिनविरोधी निवड झाली. मंडळाच्या क्रीडा इतिहासात जिल्हा खोखो संघटनेच्या कार्यकारिणीवर दोन अधिकृत प्रतिनिधींची एकाच वेळी निवड ही घटना प्रथमच घडली.

## समारोप

हीरक महोत्सवी वर्षाची सांगता झाल्यानंतर लगेचच अकस्मितपणे काळाने मंडळाच्या कार्यवाहांना आपणा सर्वांपासून हिरावून नेले त्यामुळे काही काळ मंडळाने कोणतेही कार्यक्रम केले नाहीत. या धक्यातून सावरुन मंडळाची कार्यकारिणी मंडळाच्या विकासासाठी कार्यरत झालेली आहे. मंडळाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मनपूर्वक कार्यकरण्यास आम्ही बांधील आहोत.

अहवाल कालावधीत आयोजिलेल्या कार्यक्रमांत, उपक्रमांत सहभागी होऊन सभासदांनी दिलेले सहकार्य तसेच मंडळाचे कर्मचारी, कार्यकर्ते, खेळांडू, हितचिंतक यांनी केलेले सहकार्य याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करुन आणि प्रगतीत आपला हातभार लागेल अशी सदिच्छा व्यक्त करुन हा अहवाल समाप्त करतो.

कळावे लोभ असावा आणि तो वृद्धींगत व्हावा ही विनंती.

**कार्यकारी समितीच्या अनुमतीने**

**अरुण अ. देशपांडे**

**कार्यवाह**

---

## श्रद्धांजली

**अहवाल काळात निधन पावलेल्या मंडळाच्या ज्ञात-अज्ञात सभासद हिंतचिंतक, कार्यकर्ते यांना अमर हिंद मंडळाची श्रद्धांजली.**

## (परिशिष्ट क्र. 'ब')

## हीरक महोत्सवी वसंतव्याख्यानमाला ( वर्ष ६० वे)

## २० एप्रिल ते ३० एप्रिल २००७

शुक्रवार दि. २० एप्रिल २००७

वक्ते : डॉ. भालचंद्र मुणगेकर

विषय : 'भारतासमोरील आव्हाने, स्वरुप आणि उपाय'

शनिवार दि. २१ एप्रिल २००७

वक्ते : मा. डॉ. पी. व्ही. वर्तक (एम.बी.बी.एस.पी.एच.डी.)

विषय : 'प्रताप सूर्य थोरले बाजीराव पेशवे'

रविवार दि. २२ एप्रिल २००७

वक्ते : डॉ. रामचंद्र देखणे (बी. एस्सी. एम. ए. (पारंगत) पीएच. डी.)

विषय : 'महाराष्ट्राच्या लोकभूमिका आणि प्रबोधन'

सोमवार दि. २३ एप्रिल २००७

मुलाखत : चौरंग या मान्यवर संस्थेचे संचालक श्री. अशोक हांडे यांची प्रकट मुलाखत

मुलाखतकार : 'श्री. अरुण फडके'

मंगळवार दि. २४ एप्रिल २००७

वक्ते : डॉ. अनिल बिर्जे

विषय : 'पुर्नजन्म - काल, आज व उद्या एक शास्त्रीय दृष्टीकोन'

बुधवार दि. २५ एप्रिल २००७

वक्ते : मा. श्री. दीपक घैसास C.E.O.

विषय : 'सेवा क्षेत्रातील क्रांती'

गुरुवार दि. २६ एप्रिल २००७

वक्ते : डॉ. यशवंत पाठक (एम.ए.पी.एच.डी.)

विषय : 'प्राचार्य संतवर्य सोनोपंत दांडेकर-कार्य आणि तत्त्वज्ञान'

शुक्रवार दि. २७ एप्रिल २००७

वक्ते : प्रा. डॉ. गो. वि. पारगावकर

विषय : 'क्रीडा सहभागातून व्यक्तिमत्वाचा विकास'

रविवार दि. २९ एप्रिल २००७

वक्ते : प्रा. राम शेवाळकर

विषय : 'ग्यानबाची ज्ञानेश्वरी'

सोमवार दि. ३० एप्रिल २००७

वक्ते : शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे

विषय : 'शिवचरित्र'

व्याख्यानानंतर हीरक महोत्सवी व्याख्यानमालेची सांगता झाली.

# (परिशिष्ट 'अ')

## कार्यकारी समितीच्या १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ सभा उपस्थितीची माहिती

## एकूण सभा १२

| | |
|---|---|
| १) श्री. चिंतामणी वि. नागले (कार्याध्यक्ष) | १२ |
| २) श्री. अरूण अ. देशपांडे ( कार्योपाध्यक्ष) | ०३ |
| (कार्यवाह) | ०९ |
| ३) श्री. उमेश व्यं. शेणॉय (कार्यवाह) | ०३ |
| ४) श्री. सतीश श. रेडीज (सहकार्यवाह) | १२ |
| ५) श्री. श्रीकृष्ण शं. राणे (कोषाध्यक्ष) | १० |
| ६) श्री. दीपक ना. पडते (सदस्य) | ०२ |
| (कार्योपाध्यक्ष) | ०६ |
| ७) श्री. भास्कर भिवा केरकर (सदस्य) | ११ |
| ८) श्री. चारूदत्त शां. थरवल (सदस्य) | ०४ |
| ९) श्री. विजय प्र. राणे (सदस्य) | ११ |
| १०) श्री. संजय वि. पेडणेकर (सदस्य) | ०९ |
| ११) डॉ. स्नेहल मा. बिर्जे (सदस्य) | ०४ |
| १२) श्री. प्रफुल्ल दा. पाटील (सदस्य स्विकृत) | १२ |
| १३) श्री. दत्ता अ. सावंत (सदस्य स्विकृत) | ११ |




६० व्या वसंत व्याख्यानमालेचे स्वागत डावीकडून विश्वस्त ॲड. श्री. मुकुंदराव तिवरेकर,
वक्ते योजना आयोगाचे अध्यक्ष डॉ. भालचंद्र मुणगेकर आणि कार्यवाह श्री. उमेश शेणॉय




कै. आबा पडते राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी
प्रमुख पाहुण्या सुप्रसिद्ध अभिनेत्री सविता प्रभुणे यांच्या समवेत रमेश वरळीकर,
चिंतामणी नागले, वसंत भालेकर, अरुण देशपांडे, श्रीकृष्ण राणे




६० व्या वसंत व्याख्यानमालेच्या व्यासपीठावर वक्ते डॉ. पी. व्ही. वर्तक यांच्या समवेत मंडळाचे विश्वस्त आणि इतर जेष्ठ पदाधिकारी



" कबड्डी महर्षी " पुस्तकाचे प्रकाशन झाल्यानंतर पुस्तक वाचण्यात दंग झालेले कृषी मंत्री मा. शरद पवार